स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

मानव विज्ञान विद्याशाखे अंतर्गत 'इतिहास' या विषयातील

पीएच.डी.(विद्यावाचस्पति) पदवीसाठी सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा

संशोधन आराखडा

" छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा इतिहास: एक चिकित्सक अभ्यास "

संशोधक

सुरेखा नामदेवराव शिंगणकर

संशोधक मार्गदर्शक

प्रो.(डॉ.) यु.सी.राठोड

प्राचार्य
इतिहास संशोधन केंद्र
नूतन महाविद्यालय, सेलू,
जि.परभणी

जानेवारी-२०२५

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा इतिहास : एक चिकित्सक अभ्यास

प्रस्तावना :

इ.स. १६१० मध्ये इथोपिया चा लष्करी नेता मलिक अंबर याने अहमदनगर सल्तनत ची राजधानी म्हणून काम करण्यासाठी आधुनिक औरंगाबादच्या ठिकाणी 'खडकी' नावाचे एक नवीन शहर स्थापन केले. त्याच्या पश्चात त्याचा मुलगा फतेह खान   इतिहासकारांकडून औरंगाबाद ला कधी कधी 'खुजिस्ता बन्याद' असे संबोधले जात होते.

इ.स.१६८१ मध्ये औरंगजेब सम्राट झाल्यानंतर दख्खनमध्ये आपल्या लष्करी मोहिमा चालविण्यासाठी त्याने आपला दरबार राजधानी दिल्लीतून औरंगाबाद ला हलवला. परिणामत: मुघल उच्चभ्रूंच्या उपस्थिती व वास्तव्यामुळे   औरंगाबाद चा विकास झाला.ऱ्हास पावनाऱ्या मुघल साम्राज्यातून इ.स. १७२४ मध्ये मुघल सेनानी आसफ शाह आणि दक्खन प्रदेशातील निजाम अल-मुल्क यांनी दख्खन मध्ये स्वतःच्या राजवंशाची स्थापना करण्यासाठी वेगळे होण्याचा निर्णय घेतला. पुढे इ.स.१७६३ मध्ये आसफ शाह चा मुलगा आणि उत्तराधिकारी निजाम अली खान आसिफ जाह याने जवळपास पास ४० वर्ष आपली राजधानी हैदराबादला हस्तांतरीत करे पर्यंत औरंगाबाद चे राजकीय व सांस्कृतिक दृष्ट्या महत्व कायम होते.

आधुनिक काळात इंग्रजांनी इ.स.१८१६ मध्ये निजामाच्या आधिपत्याखाली असलेल्या औरंगाबादच्या बाहेर एक छावनी स्थापन केली. परंतु निजामांनी त्यांना या शहरात प्रवेश करण्यास परावर्त केले. ब्रिटिश अधिपत्याखाली एक संस्थान म्हणून निजामाचे हैदराबाद राज्य अर्ध स्वायत होते.

भारतीय स्वातंत्र्यानंतर

इ.स.१९४८ मध्ये हैदराबाद राज्य भारतीय संघराज्य मध्ये विलीन झाले. परिणामत: औरंगाबाद भारतीय संघराज्याच्या हैदराबाद राज्याचे एक भाग बनले. पुढे इ.स.१९५६ मध्ये नवनिर्मित द्विभाषिक बॉम्बे राज्याची निर्मिती झाली व औरंगाबाद हे त्याचे अविभाज्य भाग बनले. या नंतर इ.स.१९६० मध्ये ते जिल्हा म्हणून स्वतंत्र महाराष्ट्र राज्याचा एक अविभाज्य भाग बनले.

औरंगाबाद चे कालपरत्वे नामांतर होत राहिले आहे. खडकी, फतेहनगर, खुजिस्ता बन्याद ,औरंगाबाद हया नामक्रमामध्ये पुन्हा परिवर्तनाची चर्चा आठव्या दशकात होऊ लागली. इ.स.१९८८ मधे हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी शहराचे नाव बदलून संभाजीनगर करण्याचा प्रस्ताव मांडला. इ.स. १९९५ मध्ये स्थानिक नियामक मंडळाने (सिटी कॉरपोरेशन) औरंगाबाद चे नाव बदलण्याचा ठराव संमत केला. अखेर दि.२९ जून २०२२ रोजी शिवसेनेच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र मंत्रिमंडळाने मराठा साम्राज्याचे दूसरे छत्रपती संभाजी भोसले यांच्या नावावरुन औरंगाबाद चे नाव बदलून छत्रपती संभाजीनगर करण्यास मान्यता दिली.आज मितीस ते याच नावने व्यवहृत होत आहे.

१ मे १९८१ रोजी औरंगाबाद जिल्हयाचे विभाजन होऊन जालना जिल्हयाची निर्मिती झाली. औरंगाबाद ,पैठण, वैजापूर ,गंगापूर सिल्लोड ,खुलताबाद, कन्नड, सोयगाव, फुलंब्री अश्या ०९ तालुक्यांचा औरंगाबाद जिल्हा बनला. या जिल्हयाचे एकुण क्षेत्रफळ १०,१०० चौ.कि.मी. आहे.

छत्रपती संभाजीनगर (ओरंगाबाद) तालुक्याचे एकुण क्षेत्रफळ १३०६.३८ चौ.कि.मी. आहे. तालुक्यात एकुण गावे १८७ आहेत. तालुक्यामध्ये ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत १३४ ग्रामपंचायत, १ पंचायत समिती,

जिल्हा परिषद कार्यालय आहे. तर शहरी स्थानिक स्वराज्य संस्थातर्गत ०१ महानगरपालिका , ०१ कटक मंडळ अस्तित्वात आहेत.

छत्रपति संभाजीनगर (औरंगाबाद) तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्थापने पासून ते आजतगायत ग्रामीण व शहरी स्तरांवर सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक, नागरी सुविधा इ. क्षेत्रांमध्ये कार्य करताना प्रगतीपथावर असल्याचे दिसून येतात. बदलत्या काळानुरूप तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संपूर्ण कार्यक्षेत्रात सतत बदल होत गेले आहेत. या सर्व बाबींचे स्थानिक इतिहासाच्या अभ्यासामध्ये खूप महत्व आहे.

विषयाची निवड :

स्वतंत्र महाराष्ट्र राज्याच्या निर्मिती नंतर १९६२ मध्ये पंचायतराज पध्दतीचा स्वीकार केला गेला. त्यामुळे ग्रामीण स्तरावरील स्थानिक स्वराज्य संस्थांना बळकटी आली. शहरी स्थानिक स्वराज्य संस्था ही स्थापन होऊ लागल्या.१९९२ मध्ये ७३ व्या घटना दुरूस्ती कायद्यान्वये स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा मिळाला व १९९३ पासून त्याची अंमलबजावणी सुरु झाली.

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांनी आपल्या स्थापनेपासून आजपर्यंत राजकीय, सामाजीक, आर्थिक, शैक्षणिक,सांस्कृतीक क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याची वस्तुनिष्ठ चिकित्सा व्हावी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्याचे मूल्यमापन समाजापुढे यावे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इतिहासाचा धांडोळा घेण्या करीता सदर संशोधनाचे इप्सित ठेवले आहे. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) तालुक्याच्या विकासामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचे असलेले योगदान चिकित्सक व

ऐतिहासिक दृष्टिने मांडन्यासाठी " छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा इतिहास : एक चिकित्सक अभ्यास " या विषयाची निवड केलीआहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

(१) छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा ऐतिहासिक अभ्यास करणे.

(२) छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विविध योजनांचा ऐतिहासिक आढावा घेणे.

(३) छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थानी विविध क्षेत्रात केलेल्या कार्याचे अध्ययन करणे.

(४) छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेंच्या राजकीय व प्रशासकीय व्यवस्थेचे ऐतिहासिक अवलोकन करणे.

(५) छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेंच्या ग्रामीण व शहरी भागात झालेल्या विविध सुधारणांचा अभ्यास करणे.

गृहीतके :

१) छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) ला आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे.

२) छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांनी विभिन्न स्तरावर विकासासाठी विभिन्न योजना कार्यान्वित केलेल्या दिसून येतात.

३) छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांनी तालुक्याच्या विकासासाठी सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, प्रशासकीय व सांस्कृतिक इत्यादी क्षेत्रांत कार्य केले आहे.

४) छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राजकीय व प्रशासकीय व्यवस्थेचा वेगवेगळ्या कालावधीत प्रभाव दिसून येतो.

५) छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्थापनेपासून ते आजपर्यंत ग्रामीण व शहरी भागात विविध सुधारणा झालेल्या आहेत.

तथ्य संकलन:

सामाजिक शास्त्राच्या संशोधनामधे तथ्य संकलनाचे महत्व असाधारण असून त्याचे प्राथमिक स्रोत व दुय्यम स्रोत असे दोन भाग पडतात. उक्त दोन्ही स्वरूपांच्या तथ्यांचे खालील प्रकारे संकलन करून प्रस्तुत संशोधन कार्य संपन्न होणार आहे.

(अ) प्राथमिक स्रोत / साधने :

"छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा इतिहास : एक चिकित्सक अभ्यास " या विषयाच्या संशोधनासाठी प्राथमिक स्तोत्रामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संदर्भातील विविध कायदे, शासन परिपत्रके, शासकीय अहवाल तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांचे विविध प्रशासकीय अहवाल, अंदाजपत्रके, नियोजन आराखडा, कामकाज वृंतात, निवडणूक निकाल पत्रक, विविध पत्र- व्यवहार, मुलखती इ. प्राथमिक साधनांचा वापर करण्यात येईल.

(आ) दुय्यम स्रोत / साधने :

प्रस्तुत संशोधनामध्ये दुय्यम स्रोत म्हणून छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) तालुक्यातीलच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संदर्भात महाराष्ट्र राज्याचे प्रकाशित गॅझेट, विविध अहवाल, विविध संदर्भ ग्रंथ, वृत्तपत्रे, साप्ताहिके, मासिके इ. वापर करण्यात येईल.

संशोधन पद्धती :

"छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा इतिहास : एक चिकित्सक अभ्यास " या विषयाच्या संशोधन कार्याकरीता ऐतिहासिक संशोधन पद्धती, संदर्भान्वयी, सर्वेक्षणात्मक, व्यक्ति अध्ययन, संश्लेषणात्मक, विश्लेषणात्मक इ. संशोधन पद्धतींचा प्रामुख्याने उपयोग केला जाणार आहे.

संशोधन कालावधी :

प्रस्तुत संशोधन हे छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इतिहासाशी संबंधीत असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्थापनांपासुन ते आजपर्यंतचा आढावा घेतला जाईल. या कालखंडातील विविध स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्यप्रणाली, योजनांची अंमलबजावणी, प्रशासन व राजकीय भूमिका आणि त्यातून तालुक्याचा झालेला विकास याचा ऐतिहासिक दृष्टिने अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत कालखंड निवडला आहे.

संशोधनाची व्याप्ती मर्यादा :

कोणत्याही संशोधन कार्यात मर्यादा येत असतात. इतिहासाच्या अनुशंगाने एखाद्या राज्यकर्त्याच्या कार्याचा अभ्यास करताना त्याला कालखंडाची मर्यादा लावणे सोपे जाते. परंतु एखाद्या स्थानिक स्वराज्य संस्थेचा इतिहास

अभ्यासतांना त्यास मर्यादा लावणे अवघड जाते. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) तालुक्यातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, व सांस्कृतिक विकासामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका ही महत्वपूर्ण राहीली आहे. त्या दृष्टिने संशोधनाकडे पाहीले जाणार आहे.

इतिहास लेखनामध्ये 'स्थानिक इतिहास लेखन' हा एक नवीन प्रवाह उदयास आला आहे. या स्थानिक इतिहास लेखनातून खऱ्या अर्थाने संपूर्ण राज्य व देशाचा इतिहास साकार होत असतो. म्हणून प्रस्तुत संशोधन कार्य हे छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) तालुक्याच्या इतिहासाशी संबंधित आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विशिष्ट कार्यप्रणालीमुळे तालुक्याच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय, प्रशासकीय, इ. क्षेत्रामध्ये झालेल्या विकासाचा आढावा घेण्यात येईल. स्थानिक स्वराज्य संस्थांचे तालुका स्तरीय कार्यक्षेत्र हे प्रस्तुत संशोधन कार्याकरीता मर्यादीत राहिल.

संशोधन विषयाचे महत्त्व :

औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) ला विशिष्ट ऐतिहासिक वारसा लाभला आहे. मुघलकालीन प्रशासनामध्ये या भागात विकासासाठी वेळो-वेळी प्रयत्न झाले होते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सुरुवातीस नगर परिषदेच्या माध्यमातून, इ.स.१९८२ पासून महानगरपालिकेच्या माध्यमातून आणि १९६२ पासून ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद स्तरावर विविध क्षेत्रात विकास होत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, आर्थिक, प्रशासन आदी क्षेत्रांत महत्वपूर्ण कार्य केले जात आहे.म्हणून तालुक्याच्या विकासाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची भूमिका स्थानिक स्वराज्य संस्थांची राहिली आहे. त्या दृष्टीने " छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा इतिहास : एक ऐतिहासिक अवलोकन " या

विषयाचे महत्त्व स्थानिक इतिहास, स्थानिक स्वराज्य संस्थांचे ऐतिहासिक अवलोकन, स्थानिक राजकीय पक्ष व पक्षीय राजकारण, प्रशासन इ. दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरते.

प्रकरण निहाय रचना :

प्रकरण पहिले : छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद) तालुक्याची ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमी.

प्रस्तुत प्रकरणात छत्रपती संभाजनगर (औरंगाबाद) तालुक्याची ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमीचा अभ्यास केला जाणार आहे. यामध्ये प्राचीन व मध्ययुगीन काळातील विविध राजवटी व औरंगाबादची ओळख, तालुक्यातील ऐतिहासिक स्थळे व वास्तु, तालुक्याच्या भौगोलिक सीमा,नद्या, हवामान, पर्जन्यमान, कृषी जीवन, दळणवळण, इ.चा ऐतिहासिक आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे : स्थानिक स्वराज्य संस्थांची पार्श्वभूमी.

प्रस्तुत प्रकरणात स्थानिक स्वराज्य संस्थांचा उदय व विकासाचा अभ्यास केला जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने प्राचीन भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था, मध्ययुगीन काळातील स्थानिक स्वराज्य संस्था, ब्रिटिश काळातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा विकास, स्वातंत्र्योत्तर भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा विकास आणि महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा विकास इत्यादी चे ऐतिहासिक अवलोकन केले जाणार आहे.

प्रकरण तीसरे : छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) तालुक्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांचा इतिहास.

या प्रकरणात पंचायतराज स्तरावरील स्थानिक स्वराज्य संस्थांचे ऐतिहासिक अवलोकन केले जाणार आहे. यात प्रामुख्याने छत्रपती संभाजीनगर (ओरंगाबाद) तालुक्यातील पंचायत समितीचा इतिहास, विविध ग्रामपंचायतींचे ऐतिहासिक अवलोकन, तालुक्याच्या अनुशंगाने जिल्हा परिषदेचे योगदान आढाव पाहिले जाणार

आहे. पंचायतराज स्तरावर कार्यरत पक्ष,पक्षीय राजकारण, राजकीय प्रतिनिधी, विविध ठराव व योजना, निवडणूका आदी संदर्भात ऐतिहासिक आढावा घेण्यात येईल.

प्रकरण चौथे : छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) तालुक्यातील शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा इतिहास.

प्रस्तुत प्रकरणात छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) तालुक्यातील शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा ऐतिहासिक आढावा घेतला जाईल.यामध्ये प्रामुख्याने औरंगाबाद नगरपालिकेचा इतिहास, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) महानगरपालिकेचा इतिहास,औरंगाबाद छावणी कटक मंडळ यांचा ऐतिहासिक आढावा घेतला जाणार आहे.

प्रकरण पाचवे : छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यांचे ऐतिहासिक अवलोकन.

प्रस्तुत प्रकरणात छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागातील कार्यरत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्याचे ऐतिहासिक अवलोकन केले जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने स्थानिक स्वराज्य संस्थांची धोरणे व योजनांची अंमलबजावणी, प्रशासन व राजकारण तसेच त्यांच्या शैक्षणिक,सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक कार्यांचे ऐतिहासिक अवलोकन केले जाणार आहे.

प्रकरण सहावे : निष्कर्ष व शिफारशी

शोध प्रबंधातील सहावे व शेवटचे प्रकरण निष्कर्षाचे असुन यात वरील सर्व प्रकरणाच्या अभ्यासातून तथ्य विश्लेषणाच्या आधारे संशोधनाच्या उद्देश्य व गृहितकांना अनुसरून निष्कर्ष व शिफारशी मांडल्या जातील. तसेच संशोधन प्रारंभापूर्वी मांडण्यात आलेल्या गृहितकांचे परीक्षण करण्यात येईल.छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)

तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा इतिहास : एक चिकित्सक अभ्यास " या विषयाच्या संशोधन कार्या संदर्भात अभ्यासाअंती जे निष्कर्ष हाती येतील ते प्रस्तुत केले जातील.

प्रस्तुत संशोधन आराखडा हा संभाव्य असून संदर्भ साधनांच्या उपलब्धतेनुसार शीर्षकात व नोंदविलेल्या बाबींमध्ये बदल होऊ शकतो.

संदर्भ ग्रंथ सूची :

(अ) संदर्भ ग्रंथ:

(१) पवार जयसिंगराव डॉ., आमच्या इतिहासाचा शोध आणि बोध, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, सुधारित तृतीय आवृत्ती,मार्च २०१८

(२) आपटे प्रभा व इतर,संपादन समिती, महाराष्ट्राचा ऐतिहासिक वारसा, भारतीय इतिहास संकलन समिती, मुंबई, प्रथम आवृत्ती २००९

(३) खरे.ग.द.,मध्ययुगीन महाराष्ट्राचा इतिहास,भाग १,महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळ, मुंबई, प्र.आवृत्ती २००९

(४) कुरेशी रफत,डॉ,/कुरेशी दुलारी,डॉ, औरंगाबाद-नामा,विद्या बुक्स पब्लिशर, औरंगाबाद, प्र.आवृत्ती २०१८

(५) पाटणकर पांडुरंग, सहली एक दिवसाच्या परिसरात औरंगाबाद, स्नेहल प्रकाशन, पुणे,२००१

(६) ठोंबरे सतिश, भारतातील स्थानिक स्वशासन,कैलास पब्लिकेशन,औरंगाबाद, २०१०

(७) बिरमल नितीन डॉ, पवार वैशाली डॉ, महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था, डायमंड पब्लिकेशन,औरंगाबाद, २०२०

(८) गायकवाड टि.एन.,महाराष्ट्रातील स्थानिक स्वशासन, स्वप्नाली प्रकाशन, अहमदपूर, २००१

(९) थापर,रोमीला,भारत का इतिहास, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली

(१०) वर्मा मनीषा.जे.डॉ., मध्यकाल में औरंगाबाद का शहरीकरण, राधा पब्लिकेशन, दिल्ली, प्रकाशन २०१८

(११) वाजपेयी शिवाकांत, शहर-ए-औरंगाबाद, बी.आर.पब्लिकेशन कार्पोरेशन,दिल्ली, प्रकाशन २०१९

(१२) Nigam S.R., Local Government, New Delhi,1978.

(१३) Khanna R.L., Municipal Government and Administration in India, Chandigarh,1967

(१४) Ainthankar B.R., Nineteenth Century History of Maharashtra, Popular Book Depot,Bombay, 1993

(१५) सांगळे श्रीपती,डॉ, ग्रामीण विकासासाचे प्रशासन, एज्युकेशनल पब्लिशर्स अँड डिस्ट्रिब्युटर्स,औरंगाबाद, प्रका.वर्ष २०२२

(१६) आवळे मनोज, पंचायतराज, आदिश्रेय प्रकाशन,२०२२

(१७) सागर के.,पंचायतराज , के सागर पब्लिकेशन,नासिक , २०१५

(१८)नरूला.बी.सी., पंचायतीराज व्यवस्था, अर्जून पब्लिकेशन हाऊस, दिल्ली, संस्करण-२०१६

(१९) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम,१९५८

(२०) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम,१९६१

(२१) कॉन्टान्मेंट अॅक्ट (छावणी कायदा)२००६

(ब) वृत्तपत्रे / साप्ताहिके /मासिके / नियतकालिके

(१) दै.लोकसत्ता

(२) महाराष्ट्र टाईम्स

(३) दै.लोकमत

(४) दै.सकाळ

(५) लोकराज्य

(६) योजना

(७) इंडिया टुडे

संशोधक

सुरेखा नामदेवराव शिंगणकर

मार्गदर्शक

प्रो.(डॉ.) यु.सी. राठोड

प्राचार्य

इतिहास संशोधन केंद्र

नूतन महाविद्यालय, सेलू

जि.परभणी